सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमासाठी निधी (सर्वसाधारण हिस्सा+SAP) वितरीत करणेबाबत (केंद्र व राज्य हिस्सा).

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएसए-२०१७/प्र.क्र.११० भाग-१/एस.डी-१
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २६/०२/२०१८

वाचा -

१) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई-२०००/(२७४०)/प्राशि-१, दि. १८/०१/२००२
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थस-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७
३) केंद्र शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली आदेश क्रमांक : ४-२/२०१७-EE.८ (I&IV (SAP), दिनांक ०७/०२/२०१८
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६/०२/२०१८
६) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र क्र.मप्राशिप /लेखा-२/निधी मागणी-२ रा हप्ता/२०१७-१८/५९०, दि.१२/०२/२०१८

प्रस्तावना-

सर्व शिक्षा अभियान योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिस्स्याचे प्रमाण (केंद्र : राज्य) ६०:४० असे आहे. केंद्र शासनाने दिनांक ०७/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाच्या हिस्स्याचा दुसऱ्या हप्त्याचा निधी (General रु.१०९,५४,३५,०००/-+(SAP) रु.५,३१,४९,०००/-) असा रु.११४,८५,८४,०००/- (रुपये एकशे चौदा कोटी पंच्याऐंशी लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतका निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा केलेला आहे. सर्व शिक्षा अभियान योजनेसाठी केंद्र शासनाने संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये राज्याच्या एकत्रित निधीत जमा केलेला निधी व सदर निधीच्या प्रमाणात राज्य हिस्याचा निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी संदर्भ क्र.६ येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याचे वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.७०/अर्थोपाय, दि.१६/०२/२०१८ अन्वये अभिप्राय दिले आहेत. सदर निधीच्या प्रमाणात राज्य हिस्सा (सर्वसाधारण रु.७३,०२,९०,०००/-+ SAP रु.३,५४,३२,६६७/-) असा रु.७६,५७,२२,६६७/- (रुपये शहात्तर कोटी सत्तावन्न लाख बावीस हजार सहाशे सदुसष्ट फक्त) इतका येतो. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला केंद्र हिस्स्याचा निधी (सर्व साधारण+SAP) रु.११४,८५,८४,०००/- (रुपये एकशे चौदा कोटी पंच्याऐंशी लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) व त्याप्रमाणात राज्य हिस्सा (सर्व साधारण+स्वच्छता ॲक्शन प्लॅन (SAP) रु.७६,५७,२२,६६७/- (रुपये शहात्तर कोटी सत्तावन्न लाख बावीस हजार सहाशे सदुसष्ट फक्त) असा एकूण

रु.१९१,४३,०६,६६७/- (रुपये एकशे एक्यान्नव कोटी त्रेचाळीस लाख सहा हजार सहाशे सदुसष्ट फक्त) निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबतचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

<u>शासन निर्णय-</u>

सर्व शिक्षा अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरिता "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ८००-इतर खर्च (००) (१२) सर्व शिक्षा अभियान (केंद्र हिस्सा), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२०२ ।०४९)" करिता एकूण रुपये १०६४ कोटी तरतूद अर्थसंकल्पित आहे. तर त्यास समवर्ती राज्य हिस्सा म्हणून "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ८००-इतर खर्च, (००) (००) (०५) सर्व शिक्षा अभियान (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा), (२२०२ ३०४७), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" करिता एकूण ४०० कोटी तरतूद अर्थसंकल्पित आहे.

२. केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान योजनेकरिता उपलब्ध करुन दिलेला केंद्र हिस्स्याचा दुसऱ्या हप्त्याचा निधी (सर्वसाधारण रु.१०९,५४,३५,०००/-+ (SAP) रु.५,३१,४९,०००/-) असा रु.११४,८५,८४,०००/- (रुपये एकशे चौदा कोटी पंच्याऐंशी लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) व त्याप्रमाणात राज्य हिस्सा (सर्वसाधारण रु.७३,०२,९०,०००/-+ SAP रु.३,५४,३२,६६७/- असा रु.७६,५७,२२,६६७/- (रुपये शहात्तर कोटी सत्तावन्न लाख बावीस हजार सहाशे सदुसष्ट फक्त) असा एकूण रु.१९१,४३,०६,६६७/- (रुपये एकशे एक्यान्नव कोटी त्रेचाळीस लाख सहा हजार सहाशे सदुसष्ट फक्त) इतका निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे वितरीत करण्यात आलेला रु.११४,८५,८४,०००/- (रुपये एकशे चौदा कोटी पंच्याऐंशी लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतक्या निधीचा खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ८००-इतर खर्च (००) (१२) सर्व शिक्षा अभियान (केंद्र हिस्सा), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२०२ ।०४९)" व रु.७६,५७,२२,६६७/- (रुपये शहात्तर कोटी सत्तावन्न लाख बावीस हजार सहाशे सदुसष्ट फक्त) इतक्या निधीचा खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ८००-इतर खर्च, (००) (००) (०५) सर्व शिक्षा अभियान (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा), (२२०२ ३०४७), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ या वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या दि.१८/०४/२०१७ रोजीच्या परिपत्रकाच्या परिच्छेद अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मधील १ ते ५ व ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील ६,७, ८ व १० मधील बाब या आदेशासाठी लागू नाही.

४. सदर शासन निर्णयान्वये वितरित केलेला निधी उपरोक्त संदर्भाधीन केंद्र शासनाचे दि.०७/०२/२०१८ रोजीच्या आदेशामध्ये दिलेल्या निदेशानुसार खर्च करावा.

५. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ च्या शासन परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, यांना "आहरण व संवितरण अधिकारी" तर सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. १८/०४/२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये, वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.७०/अर्थोपाय, दि.१६/०२/२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२६१६०९३०३६२१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2018.02.26 16:10:10 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
८) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ६३
९) सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
१०) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
११) सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) वित्त विभाग, (व्यय-५ / अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई
१३) अवर सचिव, रोख शाखा /कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई
१४) निवड नस्ती (एस.डी.१)